# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा ( पूर्व), मुंबई - ४०० ०५१
फोन न. २६४७ ४८ ९२ फॅक्स न. २६४७ १६१९ ई मेल jtdirrom@gmail.com


**टपाल दाखला घेऊन**

क्र.२/विकामुं/तंशि/आस्था (१)/२०१४/ 1397
दिनांक : 21 MAY 2014

**<u>नियुक्ती आदेश :</u>**

**विषय : गट-ड संवर्गामध्ये सरळसेवा प्रवेश/नामनिर्देशनाने नियुक्ती**

संदर्भ : १. शिक्षण व सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र.टिईएम ३३८९/५५९०८/(३८२१) तांशि-१अ, दि.१६/६/१९८९
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टिईडी-८००१/(३२१/०१-भाग-३)/तांशि-५, दि.१/४/२००४
३. वित्त विभाग शासन निर्णय क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/(भाग-६)/२००४/वित्तीय सुधारणा-१ दि.१/७/२००४
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, बीसीसी-२००९/प्र.क्र.२९१/०९/१६-ब, दि.५.११.२००९
५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, बीसीसी-२०११/प्र.क्र.८६/२०११/१६-ब, दि.२.८.२०११
६. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रं.न्यायप्र-२०११/प्र.क्र.११/९१ /सुधार-३, दि.८.८.२०११.
७. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११
८. उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्रं.एससीटी ६५१०/(२५६/१०)/तांशि-१, दि.२.६.२०१२
९. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि.२८.२.२०१३.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, मुंबई विभाग यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय कार्यालये/संस्थांतील **प्रयोगशाळा परिचर** पदांकरीता लेखी परीक्षा व मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर लेखी परीक्षा व मुलाखतीच्या आधारे निवड झालेल्या खालील उमेदवारांस गट-ड संवर्गात **रु.४४४०-७४४० ग्रेड पे - १३००/-** हया वेतनश्रेणीत त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या पदावर नामनिर्देशनाने तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येत आहे.

| अ. क्र. | प्राधान्यक्रम | उमेदवाराचे नाव व पत्ता | नियुक्तीचे पदनाम व संस्था/ कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | १ | **श्री. अभिजित गणेशराव कपले**<br>मु. पो. ब्राम्हणवाडा, थडी, तालुका- चांदुरबाझार, जिल्हा- अमरावती, पिन. ४४४७२० | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, पेण<br>रामवाडी, शिवाजीनगर, पेण<br>जि.रायगड<br>फोन नं.०२१४३/२५७०८१ | **खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| २ | २ | **श्री. दीपक प्रेमराव हाके**<br>मु. आमटी, पो- मोप, तालुका – पुसद, जिल्हा- यवतमाळ, ४४५ २१५ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी<br>थिबा पॅलेसजवळ, रत्नागिरी<br>ता.जि.रत्नागिरी<br>फोन नं.०२५२-२२२४३५ | **भ.ज.(क) प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| ३ | ३ | **श्री. निलेश नारायण गोटे,**<br>समर्थ नगर, वरुडा रोड, महाजन किराणा स्टोअर्सजवळ, उस्मानाबाद, -४१३ ५०१ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, मालवण<br>कुंभारमाठ, ब्रॅन्च पोस्ट ऑफीसजवळ, मालवण जि.सिंधुदुर्ग-४१६६०६<br>फोन नं.०२३६५-२५२२२३ | **खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |

| अ.क्र. | प्राधान्यक्रम | उमेदवाराचे नाव व पत्ता | नियुक्तीचे पदनाम व संस्था/ कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| ४ | ४ | **श्री.गौतम उत्तमराव हिरवे,**<br>महात्मा फुले नगर, केज, ता.केज. जि.बीड-४३११२३ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन ठाणे भारत गियर्स कंपनी समोर, फडकेपाडा, मुंब्रा जि.ठाणे-४०० ६१२, फोन नं.०२२-३२२५५९०९ | **अ.जा.प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| ५ | ५ | **श्री.संतोष मोहन गुंड,**<br>मु.पो.वाटेफळ, ता.नगर जि.अहमदनगर-४१४००१ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी थिबा पॅलेसजवळ, रत्नागिरी ता.जि.रत्नागिरी फोन नं.०२५२-२२२४३५ | **इ.मा.व. प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| ६ | ६ | **श्री मयुर दत्तात्रय पाटील**<br>बी-१६/२/१२ शिवकृपा को. हौ. सो., सेक्टर- १०, सानपाडा, नवी मुंबई पिन- ४००७०५ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन ठाणे भारत गियर्स कंपनी समोर, फडकेपाडा, मुंब्रा जि.ठाणे-४०० ६१२, फोन नं.०२२-३२२५५९०९ | **इ.मा.व. प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| ७ | ७ | **श्री हेमंतकुमार मुरलीधर खरे**<br>फ्लॅट नं. १३, लवेंडर-१, पुजानगरी, पाखल रोड, नाशिक, पिन ४२२००६ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पू) मुंबई – ४०० ०५१. फोन नं.२६४७४७८०/२६४७४५८७ | **अ.जा.प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |
| ८ | ८ | **श्रीमती वर्षा मनोज पाटील**<br>मातुल्य को ऑप. हौ. सोसायटी, सेक्टर- ०३, प्लॉट नं. ३०८, रुम. न. ०९, चारकोप, कांदीवली पश्चिम , मुंबई ४०० ०६७ | **प्रयोगशाळा परिचर**<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई ४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पू) मुंबई – ४०० ०५१. फोन नं.२६४७४७८०/२६४७४५८७ | **खुल्या (महिला) प्रवर्गासाठी आरक्षित पदावर** |

उपरोक्त उमेदवाराची सेवाजेष्ठता उपरोक्त नमूद प्राधान्य क्रमानुसार ३० दिवसांचे आंत कर्तव्यावर हजर होण्यावर अथवा मुदतवाढीवर अवलंबुन असेल. संबंधीतांची नियुक्ती खालील अटी व शर्तीच्या अधीन असेल.

१. त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावरील नियुक्ती ही **रु. रु.४४४०-७४४० ग्रेड पे – १३००** या वेतनश्रेणीत करण्यात येत असून, त्यांची नियुक्ती प्रारंभिक **रु. ४४४० + ग्रेड पे - १३००** या मूळ वेतनावर करण्यात येत आहे. शासन नियमानुसार वेळोवेळी देय होणारी वेतनवाढ अधिक शासनाने वेळोवेळी मंजूर केल्याप्रमाणे महागाई भत्ता व इतर भत्ते नियमाप्रमाणे देण्यात येतील.

२. त्यांचे वेतन वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये आहरण करण्यात येईल.

३. त्यांची नेमणूक ही पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे व आवश्यकता वाटल्यास त्यांची सेवासमाप्ती कोणतीही पूर्वसूचना न देता करण्यात येईल.

४. त्यांना जर सेवा सोडावयाची असेल, तर त्यांना एक महिन्याची नोटीस अथवा त्याऐवजी एक महिन्याच्या मूळ वेतनाइतकी रक्कम भरावी लागेल.

५. त्यांना सध्या अस्तित्वात असलेले रजेचे व इतर नियम लागू असतील. तसेच त्या नियमात नंतर वेळोवेळी होणा-या दुरुस्त्या संबंधीतांस बंधनकारक असतील.

६. वित्त विभाग शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना संबंधीत कर्मचा-यास लागू होईल.

७. त्यांना संबंधीत जिल्हयातील शल्यचिकित्सकाचे "शारीरिक स्वास्थ्य प्रमाणपत्र" दोन महिन्याच्या आत सादर करावे लागेल व ते प्रतिकूल आढळल्यास त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येतील.

८. सेवेत रुजू होण्याकरीता प्रवासभत्ता किंवा इतर कुठलाही भत्ता देण्यात येणार नाही.

९. गरज भासल्यास त्यांना नियमानुसार हमीपत्र द्यावे लागेल.

१०. त्यांच्या सेवापुस्तकातील जन्मतारीख याबाबतचा फेरफार करण्याचा अर्ज शासकीय सेवेत लागल्यापासून पाच वर्षाच्या कालावधीनंतर विचारात घेतला जाणार नाही.

**११. संदर्भ क्रं.७ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ज्या उमेदवारांची नियुक्ती सामाजिक आरक्षणाअंतर्गत मागासवर्गीयांसाठी आरक्षित जागेवर झालेली आहे, त्यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिन्याचे आंत जाती वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असून जर त्यांचे जातीविषयक प्रमाणपत्र अवैध ठरल्यास पूर्वसूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.**

१२. त्यांची सेवा ही शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटीवर असेल.

१३. त्यांची सेवा ही पोलीस खात्याने त्यांचे चारित्र्य आणि पूर्वचारित्र्य यांची पडताळणी केल्यावर व अनुकूल अहवाल प्राप्त झाल्यास पुढे चालू ठेवण्याबाबतचा विचार होईल, अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.

१४. त्यांची सेवा ही विभागीय कार्यालयाच्या/संचालनालयाच्या अधिपत्याखालील असलेल्या कोणत्याही संस्थेत/कार्यालयात बदलीस पात्र असेल.

१५. पदांच्या आढाव्याअंतर्गत शासकीय कर्मचा-यासाठी शासनाने घालून दिलेले निर्बंध संबंधीत उमेदवाराला बंधनकारक राहतील व भविष्यात त्यानुसार केली जाणारी कार्यवाही बंधनकारक असेल.

१६. नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी त्यांनी ज्या प्रमाणपत्राचे व माहितीच्या आधारे नोकरी मिळविली आहे, ती खोटी अथवा चुकीची असल्याचे आढळून आल्यास त्यांची सेवा तात्काळ समाप्त केली जाईल व ते फौजदारी कार्यवाहीस पात्र ठरतील.

१७. उमेदवार विहित मुदतीत रुजू न झाल्यास त्यांना नोकरीत स्वारस्य नाही असे समजून नियुक्ती आदेश आपोआप रद्द होईल.

वर नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून सदर उमेदवारांची तात्पुरती नेमणूक करण्यात येत आहे. वरील अटी मान्य असल्यास त्या मान्य असल्याचे रुपये २०/- च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र संबंधीत कार्यालयप्रमुखाकडे सादर करुन अर्हतेसंबंधीच्या मूळ प्रमाणपत्रासह नमूद केलेल्या कार्यालयात रुजू व्हावे.

**(जी.बी.धनोकार)**
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता रवाना.**

१. कोषागार अधिकारी / उपकोषागार अधिकारी, ठाणे/पेण/रत्नागिरी/मालवण (संस्थाप्रमुखांमार्फत)
२. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई/ ठाणे/पेण/रत्नागिरी/मालवण

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेमध्ये नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारास त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या पदावर अटी मान्य असल्याचे रुपये २०/- च्या स्टॅम्प पेपरवर पंजीबध्द प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर व अर्हतेबाबतच्या मूळ प्रमाणपत्राची तपासणी करुन रुजू करुन घेण्यात यावे. तसेच त्यांचे चारित्र्य पडताळणी व आरोग्यविषयक तपासणी **तात्काळ** करुन घ्यावी व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास पाठवावा.

४. संबंधीत व्यक्ती.
५. निवड नस्ती.

**(जी.बी.धनोकार)**
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.